# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर

मुख्य कार्यालय : टिळक नगर, मेन रोड, लातूर-४१३५१२

Tel : (PBX) (02382) 245130, 245131, 245143

E-mail : admin@laturdccb.com


## सरळसेवा नोकर भरती जाहिरात

(लिपीक (लेखनिक), शिपाई / Sub grade (Multipurpose support Staff) व वाहन चालक पदाकरीता)

दि. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्त्याखाली असलेले सेवकमांडनुसारचे रिक्त पदे सरळसेवा पद्धतीने भरणेसाठी बँकेने दि. ०३.१२.२०२५ रोजीच्या दै. लोकमत व दै. एकमत तसेच दि. १८.१२.२०२५ रोजीचे दै. एकमत व दै. पुण्यनगरी (राज्यस्तरीय) वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरण्याकरीता बँकेस निवडसुची तयार करावयाची आहे. या कारीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पद्धतीने बँकेच्या https://laturdccb.com या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर नोंदणी (रजीस्ट्रेशन ) | दि. १८.१२.२०२५ दुपारी ४.०० वाजलेपासून |
| २ | संकेतस्थळावर परिक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरणे दिनांक व वेळ | दि. २३.१२.२०२५ सकाळी ११.०० वाजेपासून<br>दि. २१.०१.२०२६ सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ३ | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येइल. |
| ४ | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येइल. |
| ५ | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येइल. |

➢ **भरावयाची श्रेणीनिहाय पदे :**

| अ.क्र. | श्रेणी | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | लिपीक (लेखनिक) | २५० |
| २ | शिपाई / Sub Grade (Multipurpose Support Staff) | ११५ |
| ३ | वाहन चालक | १० |
| | एकूण | ३७५ |

टीप :

१) बँकेने सदर जाहीरातीमध्ये नमुद केलेली पदसंख्या, इत्यादी मध्ये बदल करणेचा अधिकार बँकेचा असून होणारा बदल उमेदवारावर बंधन कारक राहील.

२) सर्व पदांसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज भरण्याची प्रक्रिया व परिक्षा घेण्यात येईल.

३) उपरोक्त सर्व पदांसाठी कोणत्याही प्रकारचे सामाजिक व समांतर आरक्षण लागू राहणार नाही.

४) निवड यादीमध्ये नांव असले तरी उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क सांगता येणार नाही. उमेदवाराची निवड कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येईल, याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

५) महाराष्ट्र शासन आदेश सुचना दिनांक ३१.१०.२०२५ निर्देशानुसार लातूर जिल्ह्यातील मुळ रहिवासी असणाऱ्या उमेदवाराकरीता ७०% पदे सर्व रिक्त श्रेणीत राखीव आहेत व उर्वरीत ३०% पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवाराकरीता खुली आहेत.

६) महाराष्ट्र शासन आदेश सुचना दिनांक ३१.१०.२०२५ निर्देशानुसार लातूर जिल्ह्याबाहेरील पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस जिल्ह्यातील पात्र उमेदवारामधून सदर श्रेणीतील पदे भरती करणेत येतील.

७) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दाखल करताना मुळ रहिवासी प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र) Domicile Certificate) अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे तसेच उमेदवाराचा वैध मतदार क्रमांक नमुद करावा लागेल.

८) उमेदवारांनी अपलोड केलेल्या अधिवास प्रमाणपत्राची छाननी, कागदपत्रे पडताळणीचे वेळी करणेत येईल.

९) भरती संदर्भात माहिती घ्यावयाची झालेस केवळ ०२२-६१०८७५४६ या हेल्पडेस्क क्रमांकावरच संपर्क साधावा. (केवळ सोमवार ते शनिवार सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंतच)

➢ **शैक्षणिक पात्रता व अनुभव :**

उमेदवाराने खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व वय हे दिनांक ३०.११.२०२५ रोजी पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदे व वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | क्लार्क / लिपीक / लेखनिक<br>पदे-२५०<br>वय मर्यादा<br>किमान २१ वर्षे व<br>कमाल ३० वर्षे<br>दि. ३०.११.२०२५ अखेर | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा ग्रॅज्युएट असावा व पदवी कालावधीतील सरासरी किमान ६०% गुण मिळवुन उत्तीर्ण असावा<br>आणि<br>उमेदवार महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम शासकीय संगणक प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे. (मान्यता प्राप्त विद्यापीठाची संगणक पदवी / पदवीका असल्यास अट शिथील राहील.) |
| २ | शिपाई, / Sub Grade (Multipurpose Support Staff) एकूण पदे ११५.<br>वय मर्यादा-<br>किमान १९ वर्षे व कमाल २८ वर्षे<br>दि. ३०.११.२०२५ अखेर | उमेदवार हा १२ वी उत्तीर्ण किमान गुण ६०% अनिवार्य. |
| ३ | वाहन चालक<br>एकूण पदे-१०<br>वय मर्यादा-<br>किमान १९ वर्षे व कमाल २८ वर्षे<br>दि. ३०.११.२०२५ अखेर | उमेदवार हा १२ वी उत्तीर्ण किमान गुण ६०% अनिवार्य.<br>मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (एल.एम.व्ही.) चालविणेचा परवाना (ड्रायव्हिंग लायसेंस) असावे. हालके / जड वाहन चालविणेचा पुर्ण कार्यकाळ (पोस्ट रेकॉर्ड) स्वच्छ असावे, उमेदवार शारीरीक दृष्ट्या सदृढ व निर्व्यसनी असावा. मराठी / इंग्रजी भाषा लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. कॅरेक्टर सर्टीफिकेट सादर करणे आवश्यक. |

टीप :

१) उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सुचना (How to Apply) वाचुन घ्याव्यात. त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर (Click) क्लिक करावे. उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्याची खात्री केल्यानंतर ऑनलाईन परिक्षा शुल्क भरावे. परिक्षा शुल्क भरल्यानंतर अर्ज दुरुस्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही. सदर परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

२) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत JPG/JEPG या प्रकारचे वेब कॅमेराद्वारे व स्कॅन केलेले छायाचित्र (Plain Background) व दोन्ही कान स्पष्टपणे दिसतील असे (Colour Photo) व पांढऱ्या स्वच्छ कागदावर काळी / निळी शाईच्या पेनने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली JPG/JEPG प्रकारची स्वाक्षरी (Signature) स्कॅन करुन **https://laturdccb.com** संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरीच्या स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज ४.५x३.५c.m. जास्तीत जास्त ८० k.b. ते २०० k.b. पर्यंत असावी. तसेच स्वाक्षरी स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज देखील वरील प्रमाणे असावी. त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही.)

३) उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करतांना स्वतःचे पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, ड्रायव्हींग लायसेंस JPG/JPEG या प्रकारामध्ये स्कॅन करून **https://laturdccb.com** या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज जास्तीत जास्त ८० k.b. ते २०० k.b. पर्यंत असावी.

४) वर नमुद पदांकरीता फक्त बँकेच्या **https://laturdccb.com** या अधिकृत संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पद्धतीने केले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेला अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःचा ई-मेल आय.डी., मोबाईल क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, ड्रायव्हींग लायसेंस, मतदान ओळखपत्र, अधिवास प्रमाणपत्र अचूक नमुद करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण, तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास, त्याची संपुर्ण जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आय.डी. व मोबाईल संदेश वाहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना एजन्सी किंवा बँक जबाबदार असणार नाही. त्यामुळे उमेदवाराने सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र / पुरावे अपलोड करणे आवश्यक आहे. ज्याची साईज १००kb जास्तीत जास्त २ mb इतकी JPEG/PDF/JPG व PNG फॉरमॅट मध्ये राहील. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे.

७) ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना कांही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

८) ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

९) जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा, पात्रता तपासूनच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा.

१०) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना बँकेच्या **https://laturdccb.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

११) ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक २३.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० पासून ते दिनांक २१.०१.२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर संकेतस्थळावर अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

१२) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःची पुर्ण माहिती ही अचुक भरावी.

➢ **परिक्षा शुल्क :**

| शुल्क रक्कम रुपये | लेखनिक / लिपीक | शिपाई / Multipurpose Support Staff | वाहन चालक |
|---|---|---|---|
| शुल्क | ७६२ | ७६२ | ७६२ |
| जीएसटी (१८%) | १३८ | १३८ | १३८ |
| एकूण परिक्षा शुल्क | ९०० | ९०० | ९०० |

**सदर परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.**

➢ **परिविक्षाधिन / Probation कालावधी :**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन / Probation सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीमध्ये श्रेणीनिहाय दरमहा संकलीत पगार देण्यात येईल.

➢ **वेतन श्रेणी :**

बँकेच्या सेवेत कायम केलेनंतर कायम सेवकाप्रमाणे खालील श्रेणीतील नमुद मुळ वेतन, लागु असलेला डि.ए. व सेवानियमानुसार भत्ते अदा केले जातील.

| पद | मुळ वेतन श्रेणी रुपये |
|---|---|
| लिपीक (लेखनिक) | ४१०-३०-५६०-४०-७६०-५०-१०१०-६०-१३१०-७०-१६६०-८०-१९००-९०-२०८० |
| शिपाई / सबग्रेड (Multipurpose Support Staff) | ३१०-१५-३८५-२०-४८५-२५-६१०-३०-७६०-४०-९६०-५०-१२१०-६०-१३९०-७०-१५३० |
| वाहन चालक | ३२०-१५-३९५-२०-४९५-२५-६२०-३०-७७०-४०-९७०-५०-१२२०-६०-१४००-७०-१५४० |

➢ **निवड कार्यपद्धती :**

१. **लिपीक / लेखनिक :**

लिपीक/ लेखनिक श्रेणीतील पदांकरिता १०० गुणांपैकी ९० गुणांसाठी संगणकाद्वारे ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षा ९० प्रश्नांची असून प्रत्येक प्रश्नास १ गुण असणार आहे. या ऑनलाईन परिक्षेसाठी ९० मिनीटांचा कालावधी राहील. ऑनलाईन परिक्षेसाठी शेती पतपुरवठा त्रिस्तरीय रचना, बँकींग व सहकार, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी व इंग्रजी भाषा ज्ञान, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, संगणक माहिती तंत्रज्ञान व बुद्धीमापन चाचणी या विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नांचा समावेश असेल. ऑनलाईन परिक्षेचे माध्यम इंग्रजी व मराठी असेल.

➢ **मुलाखत : लिपीक / लेखनिक पदांकरीता.**

- ऑनलाईन परिक्षेत पदनिहाय गुणनुक्रमे पात्र झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी होऊन कागदपत्र पडताळणीत पात्र होणाऱ्या उमेदवारास १० गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.
- ५ गुण हे शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबींसाठी असतील व ५ गुणांसाठी बँकेने गठीत केलेल्या समिती मार्फत मौखिक Interview घेण्यात येईल.
- उमेदवार गैरहजर राहिल्यास, तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही.
- शैक्षणिक पात्रतेनुसार देण्यात येणार ५ गुण खालील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुण |
|---|---|---|
| १ | एम.कॉम./एम.बी.ए. (बँकींग किंवा फायनान्स) /एम.ई. (संगणक) किंवा (आय.टी.) / एम.एस.सी. (अॅग्री)/ एल.एल.बी./एल.एल.एम किमान ६०% गुण मिळवून उत्तीर्ण असल्यास | १ |
| २ | सीएआयआयबी /जेएआयआयबी / डी.टी.एल. (Diploma in Taxation Laws) | १ |
| ३ | जी.डी.सी. अॅण्ड ए. व एच.डी.सी.एम. (किमान ६०% गुण मिळवुन पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असावा) | १ |
| ४ | बँकेतील कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव (पतसंस्था, निधी पतसंस्था, मल्टिस्टेट पतसंस्था, सर्व प्रकारच्या फायनान्स कंपन्या / संस्थांमधील अनुभव दाखला ग्राह्य धरता येणार नाही.) | २ |
| | **एकूण** | ५ |

२. **<u>शिपाई / Sub Grade (Multipurpose support Staff) व वाहन चालक</u>**

शिपाई / Sub Grade व वाहन चालक श्रेणीतील पदांकरिता १०० गुणांपैकी ९० गुणांसाठी संगणकाद्वारे ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षा ९० प्रश्नांची असून प्रत्येक प्रश्नास १ गुण असणार आहे. या ऑनलाईन परिक्षेसाठी ९० मिनीटांचा कालावधी राहील. ऑनलाईन परिक्षेसाठी मराठी व इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान, लातूर जिल्ह्याची माहिती, गणित, बुद्धीमापन चाचणी व बँकींग/सहकार या विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नांचा समावेश असेल. ऑनलाईन परिक्षेचे माध्यम इंग्रजी व मराठी असेल.

**टिप** : शिपाई / Subgrade (Multipurpose Support Staff / वाहन चालक पदास शैक्षणीक अर्हतेसाठी पाच (५) गुणांचे भारांकन लागु राहणार नाही. त्यांची मौखिक परिक्षा दहा (१०) गुणांची असेल.

१. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणी करीता पात्र उमेदवारांचे आसन क्रमांकाची यादी बँकेच्या **https://laturdccb.com** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.

२. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल.

३. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास, त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

४. परिविक्षाधिन कालावधी (Probation period)-निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन (प्रोबेशन) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीत उपरोक्त प्रमाणे श्रेणीनिहाय दरमहा संकलित वेतन देण्यात येईल, या कालावधीतील कामकाज व वर्तणुकीबाबतचा अहवाल विचारात घेऊन बँकेच्या सेवेत कायम करणे बाबत विचार करण्यात येईल.

५. नियुक्तीपुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक ती मुळ कागदपत्रे इत्यादीची पडताळणी संबंधीत प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीअंती उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्र / प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास, अशा उमेदवारास कुठल्याही टप्प्यावर नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल.

६. उमेदवारांना दि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., यांचे आदेशास अधिन राहून कार्यक्षेत्र जिल्हा बँकेच्या कोणत्याही शाखा / कार्यालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसांचे आत रुजू होणे आवश्यक राहील.

➢ **कागदपत्र पडताळणी :**

१. ऑनलाईन परिक्षेत प्राप्त होणाऱ्या गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पदसंख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी (परिक्षेचा बैठक क्रमांक) बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२. मुलाखतीस पात्र उमेदवारांस शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील.

३. उमेदवाराने कागदपत्रे / प्रमाणपत्राची मुळ प्रत व एक प्रमाणित झेरॉक्स प्रत पडताळणीचेवेळी बँकेस सादर करणे अनिवार्य आहे.

४. कागदपत्रांचा तपशिल :

| श्रेणी | कागदपत्रांचा तपशिल |
|---|---|
| **लिपीक (लेखनिक)** | उमेदवाराने ऑनलाईन अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, विवाहीत महिलांच्या बाबतीत नावात बदल झालेबाबतचा पुरावा (महाराष्ट्र शासन राजपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र), जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला / इयत्ता १० वी सनद. |
| **शिपाई, / Sub Grade / (Multipurpose Support Staff)** | उमेदवाराने अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, विवाहीत महिलांच्या बाबतीत नावात बदल झालेबाबतचा पुरावा (महाराष्ट्र शासन राजपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र), जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला / इयत्ता १० वी सनद. |
| **वाहन चालक** | उमेदवाराने अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, जन्मतारखेचा पुरावा म्हणून इयत्ता १० वी सनद व शाळा सोडल्याचा दाखला तसेच ड्रायव्हींग लायसन (हलके / जड वाहन). |

➢ **कागदपत्र पडताळणी / मुलाखत पत्र :**

१) मुलाखत पत्र ऑनलाईन पद्धतीने बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. सदर मुलाखत पत्र ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावरील उमेदवारांनी रजिस्टर केलेल्या लॉगीन आय.डी. वरुन डाऊनलोड करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचणी निर्माण झाल्यास ०२२-६१०८७५४६ नंबर वर संपर्क साधावा.

२) उमेदवारास मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस बोलविण्यात येईल.

३) या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस तसेच नियुक्तीस पात्र राहणार नाही.

➢ **उमेदवाराची अंतीम निवड सुची :**

निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी अधिक शैक्षणिक पात्रतेनुसार मिळालेले गुण तसेच ऑनलाईन परिक्षेतील गुण यांची गुणानुक्रमे अंतिम निवड सुची तयार करण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहणार नाही.

मौखीक (मुलाखत) व मिळालेल्या ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या अधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करणेत येईल. व गुणवत्तेनुसार क्रम दर्शवुन बॅकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येईल. प्रतिक्षा यादीची मुदत ही निवड झालेल्या उमेदवारांना बँकेमार्फत नियुक्ती आदेश दिलेल्या दिनांकापासून एक वर्ष इतकी राहील.

ऑनलाईन परिक्षा एकापेक्षा अधिक सत्रामध्ये (Shift) झाल्यास, प्रश्नपत्रिकेच्या अवघड पणानुसार (Dificulty Level) गुणांचे Normalization करणेत येईल व अंतिम गुणवत्ता यादी ही Normalized गुणावर अधारीत असेल.

➢ **सर्वसाधारण अटी व शर्ती :**

ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिद्ध होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास, उमेदवाराची निवड कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१) उमेदवाराची संगणकाद्वारे ऑनलाईन परिक्षा लातूर जिल्ह्यातील केंद्रावर व इतरही जिल्ह्यातील केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल. (उमेदवारास जिल्ह्यातीलच केंद्रावर परिक्षा घेण्यात यावी, असा हक्क सांगता येणार नाही.)

२) पात्रतेबाबतच्या खोट्या माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास, अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

३) पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत व या बाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरूण विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षा केंद्र / बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

५) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्क आहे.

६) महाराष्ट्र शासन आदेश सुचना दिनांक ३१.१०.२०२५ निर्देशानुसार लातूर जिल्ह्यातील मुळ रहिवासी असणाऱ्या उमेदवाराकरीता ७०% पदे सर्व रिक्त श्रेणीत राखीव आहेत व उर्वरीत ३०% पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवाराकरीता खुली आहेत.

७) महाराष्ट्र शासन आदेश सुचना दिनांक ३१.१०.२०२५ निर्देशानुसार लातूर जिल्ह्याबाहेरील पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस जिल्ह्यातील पात्र उमेदवारामधून सदर श्रेणीतील पदे भरती करणेत येतील.

८) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दाखल करताना मुळ रहिवासी प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र / Domicile Certificate) अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे.

९) लिपीक उमेदवारास मराठी व इंग्रजी तसेच सबग्रेड / वाहनचालक उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१०) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरिता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस / कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, तसेच नियुक्ती झाली असल्यास, कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त / रद्द करण्यात येईल.

१२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

१४) ऑनलाईन परिक्षेस / कागदपत्र पडताळणीस / मौखिक मुलाखतीस बोलविलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१५) भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः त्यात बदल करणे, पदाच्या एकूण संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बँकेस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहील. या बाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

१६) ऑनलाईन परिक्षा, कागदपत्रे छाननी इ. करीता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सुचना या केवळ संकेतस्थळावरूनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब, सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१७) परिक्षा केंद्रावर नेटवर्क संदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास व सदरहू अडचणींचे निवारण विहीत मुदतीत न झाल्यास व त्या कारणाने त्या तारखेची परिक्षा रद्द झालेस, संबंधीत उमेदवारांच्या परिक्षा इतर केंद्रावर किंवा त्याच केंद्रावर योग्य त्या तारखेस व वेळेस द्यावयाचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. अशा परिस्थितीत उमेदवारांच्या परिक्षेची तारीख, परिक्षा केंद्र व परिक्षेची वेळ या बाबत संबंधीत माहिती बँकेच्या वेबसाईटवर सुधारीत सुचना निर्गमित होतील. संबंधीत उमेदवारांना त्यांचे मोबाईल किंवा ई-मेल तांत्रिक अडचणीमुळे सदरहू संदेश प्राप्त न झाल्यास, अशा उमेदवारांनी याबाबतची माहिती भरतीच्या व बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून प्राप्त करन घ्यावयाची आहे.

१८) अंतिम निवड झालेल्या उमेदवारास बँकेकडे किमान ३ वर्षे सेवा करणे बंधनकारक राहील. या बाबत बँकेने ठरवून दिलेल्या नमुन्यात करार / हमीपत्र करून द्यावे लागेल.

१९) <u>ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप.</u>

1. **LATUR DCCB** has decided to introduce mandatory time-bound groups in all its MCQ-based examinations which are conducted on a computer-based platform. This measure has been implemented to enhance the security and sanctity of the exams in light of emerging threats during the examination process.

   LATUR DCCB नेसंगणक-आधारित प्लॅटफॉर्मवर आयोजित केलेल्या सर्व MCQ-आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य वेळ -बद्ध विभाग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या धोक्यांच्या प्रकाशात परीक्षेची सुरक्षा आणि पावित्र्य वाढवण्यासाठी हा उपाय लागू करण्यात आला आहे

2. The question paper in these examinations will be divided into multiple time-bound groups. For example, in LATUR DCCB Exam, if there are 4 time-bound groups (A, B,C& D) in the question paper, each group will have max23questions and 23minutes of time allotted. Candidates will be restricted from proceeding to the next group until they complete the allotted time for the previous group. Additionally, candidates will not be allowed to review the questions or modify their responses for a group after the completion of its allotted time. The questions for the next group will start automatically after the completion of the allotted time for the previous group.

   या परीक्षांमधील प्रश्नपत्रिका अनेक कालबद्ध गटांमध्ये विभागल्या जातील. उदाहरणार्थ, **LATUR DCCB** परीक्षेत, प्रश्नपत्रिकेत चारकालबद्ध विभाग (A, B,Cआणि D) असल्यास, प्रत्येक विभागात **23** प्रश्न असतील आणि **23** मिनिटे वेळ दिला जाईल. मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण करेपर्यंत उमेदवारांना पुढील विभागात जाण्यास प्रतिबंध -

केला जाईल. याव्यतिरिक्त, उमेदवारांना दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागाचे प्रश्न आपोआप सुरू होतील

3. Candidates are given the option to mark any question, whether attempted or not, for review. This means that candidates can go through these marked questions in a group again before the allotted time for that group ends. It is important to note that questions marked for review will be evaluated.

उमेदवारांना कोणताही प्रश्न, प्रयत्नकेला असो वा नसो, पुनरावलोकनासाठी चिन्हांकित करण्याचा पर्याय दिला जातो. याचा अर्थ असा की त्या गटसाठी दिलेली वेळ संपण्याआधी उमेदवार या चिन्हांकित प्रश्नांमधून पुन्हा एका विभागात जाऊ शकतात. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की पुनरावलोकनासाठी चिन्हांकित केलेल्या प्रश्नांचे मूल्य मापन केले जाईल.

**Pattern of Examination and related instructions / परीक्षेचेस्वरूपवत्याअनुषंगिकसूचना**

**Latur DCCB – Clerk Post**

| Sr. No. | Subject Name / विषयाचेनाव | Group Name | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Group A | Group B | Group C | Group D |
| 1 | Agri finance & three tire structure, Rural Agricultural Finance. | 4 | 4 | 4 | 3 |
| 2 | Banking &Co. Operative | 4 | 4 | 3 | 4 |
| 3 | G.K., Current Affair, English Language | 4 | 3 | 4 | 4 |
| 4 | Math's | 5 | 5 | 5 | 5 |
| 5 | Computer knowledge& I.T. | 3 | 4 | 4 | 4 |
| 6 | Reasoning test | 3 | 3 | 2 | 2 |
| Number of Questions / प्रश्नांचीसंख्या – Total 90 Questions | | 23 Questions | 23 Questions | 22 Questions | 22 Questions |
| Group Wise Timing / विभागानुसारवेळ - Total 90 Minutes | | 23 Minutes | 23 Minutes | 22 Minutes | 22 Minutes |

**Pattern of Examination and related instructions / परीक्षेचेस्वरूपवत्याअनुषंगिकसूचना**

**Latur DCCB – Peon &Driver Post**

| Sr. No. | Subject Name / विषयाचेनाव | Group Name | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Group A | Group B | Group C | Group D |
| 1 | English Language | 2 | 2 | 3 | 3 |
| 2 | Marathi Language | 3 | 3 | 2 | 2 |
| 3 | Latur District Geographical & History | 5 | 5 | 5 | 5 |
| 4 | Numerical ability test (Math's) | 5 | 5 | 5 | 5 |
| 5 | Banking &Co. Operative Finance | 2 | 3 | 2 | 3 |
| 6 | Reasoning Test | 5 | 5 | 5 | 5 |
| Number of Questions / प्रश्नांचीसंख्या – Total 90 Questions | | 22 Questions | 23 Questions | 22 Questions | 23 Questions |
| Group Wise Timing / विभागानुसारवेळ - Total 90 Minutes | | 22 Minutes | 23 Minutes | 22 Minutes | 23Minutes |

कार्यकारी संचालक
(दि. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर)

स्थळ : लातूर
दिनांक : १८.१२.२०२५